


अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगाव

Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड । मंगळवार

८.०९.२०२६

वरुड **दर्पण**

जनसामान्यांच्या मनातील आरसा

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235

chandubhad@gmail.com

www. waruddarpan.com

9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: २२० | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712


# चार बळी घेणारी नरभक्षक वाघीणीचा दुर्दैवी मृत्यू

## शिरजगाव कसबा शिवारात गुंगीचे औषध टोचून पकडले : मोर्शीनजीकच्या शाळेत सोडले प्राण














- सोनोरीनंतर शिरजगाव कसबा शिवारात शेतकऱ्याचा घेतला बळी
- वाघिणीच्या धुमाकुळीमुळे शेतकऱ्यांमध्ये पसरली होती दहशत
- पुण्याच्या विशेष पथकाने वाघिणीला डार्ट मारून केले बेशुद्ध
- मोर्शीकडे नेताना वाघिणीचा रस्त्यातच दुर्दैवी अंत
- चार निष्पाप जिवांचा बळी घेणारी मोहीम फत्ते



*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**अमरावती** – अमरावती आणि वर्धा जिल्ह्याच्या ग्रामीण भागात गेल्या वीस दिवसांपासून सतत धुमाकूळ घालत चार निष्पाप शेतकऱ्यांचा जीव घेणाऱ्या पिंकी नावाच्या नरभक्षक वाघिणीला अखेर वनविभागाच्या बचाव पथकाने सोमवारी दुपारी शिरजगाव कसबा शिवारात गुंगीचे औषध टोचून जेरबंद केले.

मात्र पकडल्यानंतर तातडीने पुढील उपचारासाठी नागपूरकडे नेत असताना वाटेतच या वाघिणीचा मृत्यू झाला. त्यामुळे संपूर्ण पंचक्रोशीतील शेतकऱ्यांची जीवघेणी भीती कायमची संपली असली तरी मोहिमेचा शेवट मात्र दुर्दैवी ठरला.

वर्धा जिल्ह्यातील आष्टी भागातून वरुड, मोर्शी आणि चांदूर बाजार तालुक्यात घुसलेल्या या वाघिणीने संपूर्ण शेतशिवारात मोठा थरकाप उडवला होता. या हल्लयांमध्ये १७ ऑगस्ट रोजी नरसिंगपूरचे रामभाऊ भोयर (वय ७४ वर्षे), २७ ऑगस्ट रोजी भांबोरा येथील चरणदास ईखे (वय ५५ वर्षे), ६ सप्टेंबर रोजी सोनोरी येथील उर्मिला बाजीराव इवने (वय १८ वर्षे) आणि ७ सप्टेंबर रोजी शिरजगाव कसबा येथील दिनेश आवारे (वय ४५ वर्षे) या चार जणांचा जागीच बळी गेला. अवघ्या चोवीस तासांत लागोपाठ दोन शेतकऱ्यांचे बळी गेल्यामुळे शेतकरी आणि मजुरांचा संताप शिगेला पोहोचला होता. लोक रस्त्यावर उतरल्याने प्रशासनाने मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला.

सोमवारी सकाळी चांदूर बाजार तालुक्यातील शिरजगाव कसबा येथील रहिवासी दिनेश उर्फ दामू आवारे हे गावापासून दोन किलोमीटर अंतरावरील वीज केंद्राजवळ असलेल्या कालाटोला जंगल शिवारातील शेतात खत टाकण्यासाठी गेले होते. दबा धरून बसलेल्या वाघिणीने त्यांच्यावर मागून अचानक प्राणघातक झडप घातली. हा हल्ला इतका भयानक होता की त्यांना सावरण्याची संधीही मिळाली नाही. शेतकऱ्याची शिकार केल्यानंतर वाघीण दिनेश यांच्या मृतदेहाजवळच बराच वेळ ठाण मांडून बसून राहिली. हे थरारक दृश्य पाहून शेतात धाव घेतलेल्या शेतकऱ्यांची बोबडी वळली.

या घटनेची माहिती वाऱ्यासारखी पसरताच केणीपुरा, शिरजगाव कसबा, सोनोरी, देऊळवाडा, रिद्धपूर, भांबोरा आणि नजरपूर परिसरातील शेकडो ग्रामस्थ शेताकडे धावले.

वाढता जनक्षोभ पाहून आ. बच्चू कडू यांनी मृत उर्मिला इवने हिच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. माजी खासदार नवनीत राणा यांनीही घटनास्थळी पोहोचून नातेवाइकांचे अश्रू पुसले, तर आ. प्रवीण तायडे दोन दिवसांपासून तळ ठोकून परिस्थिती हाताळत होते. खा.बळवंत वानखडे यांनी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्याशी चर्चा करून तात्काळ वाघिणीचा बंदोबस्त करण्याचे निर्देश दिले होते. मुख्य वन्यजीव रक्षकांच्या आदेशानंतर अमरावती, मेळघाट, अकोला, वर्धा, चंद्रपूर आणि पुण्याचे विशेष बचाव पथक कामाला लागले.

अमरावती बचाव पथकाचे प्रमुख अमोल गावनेर यांच्या देखरेखीखाली दिवसरात्र गस्त, कॅमेरे आणि उष्णता टिपणारे ड्रोन फिरवून वाघिणीचा माग काढण्यात आला. अखेर पुण्याच्या रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्टचे मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. हेमराज यांनी अत्यंत सावधपणे अचूक नेम धरून बेशुद्धीचे औषध मारले. वाघीण जमिनीवर कोसळताच तिला जेरबंद करण्यात आले. उपवनसंरक्षक अर्जुना के. आर. आणि जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटूरवार यांच्या माहितीनुसार, प्राथमिक उपचारानंतर नागपूरकडे नेताना वाघिणीने प्राण सोडले. वनविभागाने मृतांच्या कुटुंबीयांना तातडीची आर्थिक मदत दिली.

### हलगर्जीपणामुळे वाघिणीचा गुदमरून मृत्यू झाल्याचा संशय

परतवाडा येथे उपचाराची सोय असताना वाघिणीला नागपूरला का नेण्यात येत होते, असा प्रश्न उपस्थित होत आहे. मोर्शी येथील झेनित स्कूलमध्ये उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. वाघिणीला मारलेल्या दोन डार्टची औषधमात्रा कारणीभूत ठरली की ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे तिचा जीव गेला, अशी दाट शंका व्यक्त केली जात आहे. डार्ट मारल्यानंतर तिला वाघाऐवजी बिबट्याच्या लहान पिंजऱ्यात डांबण्यात आले होते. घटनास्थळी लोकांची प्रचंड गर्दी उसळली होती आणि मोर्शीला आणताना वाघिणीला संपूर्ण कपड्यात गुंडाळल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यामुळे श्वास गुदमरून तिचा मृत्यू झाल्याचा आरोप होत आहे. वन अधिकाऱ्यांचा निष्काळजीपणा, डार्टचा ओव्हरडोस आणि अयोग्य वाहतूक या सर्व संशयास्पद मुद्यांची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. वनविभागाच्या अहवालानंतरच सत्य समोर येईल.

### लोकप्रतिनिधींकडून मृतांच्या कुटुंबियांचे सांत्वन

सलग हल्लयांमुळे संताप उसळल्यानंतर आ. बच्चू कडू आणि माजी खासदार नवनीत राणा यांनी सोनोरी येथे जाऊन मृत उर्मिला इवने हिच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले. आ. प्रवीण तायडे परिस्थितीवर नजर ठेपूर होते, तर जा. बळवंत वानखडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून वाघिणीला जेरबंद करण्याचे तातडीने निर्देश दिले होते.

### डॉ.हेमराज यांचा अचूक नेम

पुण्यातील रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्टचे मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. हेमराज यांनी अत्यंत कौशल्याने परिस्थिती हाताळली. घटनास्थळावरील मोठी गर्दी आणि वाघिणीचा आक्रमक पवित्रा लक्षात घेऊन त्यांनी अचूक संधी साधत वाघिणीवर नेम धरला. डोर्ट लागताच काही मिनिटांतें वाघीण बेशुद्ध झाली आणि पुढील मोठा धोका टळला.

### मानव–वन्यजीव संघर्षाचा आणखी एक बळी

या घटनेमुळे पुन्हा एकदा मानव–वन्यजीव संघर्षाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वाढत्या वर्नोतील नाश, शेतीच्या विस्तारामुळे वन्यप्राण्यांचे नैसर्गिक अधिवास कमी होत आहेत. त्यामुळे अशा घटना वारंवार घडत असल्यांचे तज्ञांचे म्हणणे आहे.



---

## गोंदिया-बालाघाट महामार्गावर भीषण अपघात

# ट्रक अन बोलेरोच्या धडकेत ६ जणांचा जागीच मृत्यू, ७ गंभीर

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***गोंदिया*** – गोंदिया–बालाघाट राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघाताची घटना घडली आहे. गोंदियाच्या नागरा येथे भरधाव ट्रक आणि बोलेरो प्रवासी वाहनाची समोरासमोर धडक झाली.





या अपघातात ६ जणांचा जागीच मृत्यू झाला असून ७ जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, गोंदियाकडून बालाघाटच्या दिशेने एक भरधाव ट्रक जात होता. याचवेळी बालाघाटकडून गोंदियाच्या दिशेने बोलेरो प्रवासी वाहन येत होते. नागरा परिसरात दोन्ही वाहनांची जोरदार समोरासमोर धडक झाली. दोन्ही वाहनांमध्ये झालेली धडक इतकी भीषण होती की बोलेरो वाहनाचा अक्षरशः चेंदामेंदा झाला.

**६ प्रवाशांचा जागीच मृत्यू**

या भीषण अपघातात बोलेरोमधील ६ प्रवाशांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती आहे. तर अन्य ७ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

**मृत आणि जखमी मध्यप्रदेशातील**

या अपघातातील मृत्यू झालेले सर्व प्रवासी मध्यप्रदेशातील बालाघाट जिल्ह्यातील असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मात्र, मृत आणि जखमी प्रवाशांची अधिकृत ओळख तसेच अपघातातील नेमकी परिस्थिती याबाबत संबंधित प्रशासनाकडून अधिक माहिती समोर येणे बाकी आहे. दरम्यान, या भीषण अपघातामुळे गोंदिया–बालाघाट महामार्गावर काही काळ वाहतुकीवरही परिणाम झाला होता.

---

# रहमत नगरात युवकाची चाकूने भोसकून निघृण हत्या

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

## कलीम नगर येथील सरकारी हॉस्पिटल जवळील घटना



***अमरावती*** – गुन्हेगारांनी पोलिसांचा धाक अक्षरशः धुडकावून लावत खोलापुरी गेट हद्दीतील रहमत नगर व हैदरपुरा भागात पुन्हा एकदा रक्ताचा सडा पाडला.

जुन्या वादाचा वचपा काढण्यासाठी चार ते पाच जणांच्या टोळक्याने भररस्त्यात वीस वर्षांच्या तरुणावर चाकूने सपासप दोन वार करून त्याचा निघृण काटा काढला. चोवीस तासांत घडलेल्या या दुसऱ्या हत्येमुळे शहरात प्रचंड संतापाची लाट उसळली असून चालू वर्षातील हा ३५ वा बळी ठरला आहे.

शेख राहील उर्फ गणी शेख फारूक (वयवर्षे – २१, कबीर नगर, रहमत नगर) असे मयत तरुणाचे नाव असून संतापलेल्या जमावाचा उद्रेक होण्याआधीच पोलिसांनी चक्रे फिरवून तासाभरात दोघांच्या मुसक्या आवळल्या. सोमवारी सायंकाळच्या सुमारास किरकोळ वादाची ठिणगी पडली होती.

तो वाद मिटल्याचा आव आणत दबा धरून बसलेल्या मारेकऱ्यांनी रात्री ९.४५ वाजताच्या सुमारास रहमत नगर येथील महापालिका दवाखान्याजवळ राहीलला घेरले. काही समजायच्या आत अंगावर धावून जात त्याच्या छातीवर आणि डोक्यावर शस्त्रांनी सपासप वार चढवले. रक्ताच्या थारोळ्यात राहील निपचित पडताच हल्लेखोर पसार झाले.

मित्रांनी तातडीने त्याला दुचाकीवरून जिल्हा सामान्य रुग्णालयात आणि नंतर खासगी रुग्णालयात नेले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

# गणेशोत्सवात सजावटीचा नवा ट्रेंड

■ (प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई** – गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून मुंबईतील सजावटीच्या बाजारपेठा नव्या ट्रेंडने खुलल्या आहेत. यंदा पारंपरिक थर्माकोलच्या मखरांना मागे टाकत पीव्हीसी फोम, पुनर्वापर करता येणाऱ्या साहित्यापासून बनविलेल्या इको-फ्रेंडली मखरांना मोठी मागणी आहे. तसेच एलईडी



बॅकलिट डेकोरेशन, कृत्रिम फुलांचे भव्य बॅकड्रॉप सजावट हे यंदाच्या गणेशोत्सवाचे प्रमुख आकर्षण ठरत आहे.

नगर परिषद प्राथमिक शाळा क्र.१ मध्ये

# डॉ.राधाकृष्णन यांची जयंती 'शिक्षक दिन' म्हणुन साजरा

■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – नगर परिषद प्राथमिक शाळा क्र.१ मध्ये माजी राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती 'शिक्षक दिन' म्हणून अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रभारी मुख्याध्यापक आशिष तडस यांनी भूषविले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून व वंदन करुन करण्यात आली. याप्रसंगी संदीप कोकाटे यांनी विद्यार्थ्यांना शिक्षक दिनाचे महत्त्व आणि डॉ. राधाकृष्णन यांच्या जीवनकार्याबद्दल सविस्तर माहिती दिली.या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे 'स्वयंशासित शाळा' हे होते. बालशिक्षक बनुन मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भुमिका अत्यंत जबाबदारीने पार पाडली. विद्यार्थ्यांनी विविध वर्गांवर जाऊन इतर विद्यार्थ्यांना शिस्तबद्ध पद्धतीने अध्यापन केले. दिवसभर शाळेचे नियोजन, तासिकांचे संचालन आणि शिस्त राखण्याचे काम विद्यार्थ्यांनी स्वतः केल्यामुळे त्यांना स्वयंशासनाचा एक वेगळा आणि समृद्ध अनुभव मिळाला. शिक्षक आणि मुख्याध्यापकांच्या भूमिकेत



असलेल्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास यावेळी वाखाणण्याजोगा होता. कार्यक्रमाच्या यशस्वी वाटचालीत सविता बोबडे, भाग्यश्री खवले, शालिनी फरकाडे, मीनल गोरडे, सुनिता उपासे कावनपुरे, हर्षदा श्रीखंडे व अनिता दुपारे या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रम प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. संचालन विजय बेलसरे यांनी केले.

स्वामी विवेकानंद मानवता गुरुकुल ढगा येथे

# डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती



■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – जनता इंग्लिश स्कूलमध्ये भारताचे माजी राष्ट्रपती, महान शिक्षणतज्ज्ञ डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत विविध कार्यक्रमांचे आयोजन केले. विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाचे महत्त्व सांगणारी भाषणे, सादर करून शिक्षकांविषयीचा आदर व प्रेम व्यक्त केले. यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिकेत राहून शाळेतील अध्यापनाचा अनुभव घेतला. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि जबाबदारीची भावना विकसित होण्यास मदत झाली.

शिक्षक दिनानिमित्त मुख्याध्यापिका जयश्री आंडे तसेच सर्व शिक्षकांचा विद्यार्थ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शिक्षणासोबतच संस्कार, शिस्त, प्रामाणिकपणा आणि चांगल्या मूल्यांचे महत्त्व पटवून दिले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण कार्यक्रम आनंददायी व संस्मरणीय ठरला.

डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयाचे वरिष्ठ लिपिक

# मनीष सावरकर यांचा शिक्षक दिनाच्या पर्वावर सेवापूर्ती समारंभ

■ (प्रतिनीधी वरूड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – येथील जनता शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयाचे वरिष्ठ लिपिक मनीष सावरकर यांचा सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यात आला.



कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी जनता शिक्षण संस्थेचे संचालक ॲड.प्रभाकर सावरकर, सत्कारमुर्ती मनीष सावरकर, सविता सावरकर, अतिथी म्हणुन संस्थाध्यक्ष जगदीश काळे, उपाध्यक्ष अरुण काळे, सचिव मोहन गणोरकर, सहसचिव चंद्रशेखर टाकरखेडे, संचालक राजेंद्र बेलसरे, आजीवन सभासद चंद्रशेखर अकर्ते, सभासद सुरेश काळे, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य प्रकाश आंजनकर, प्रा.बाबाराव ठाकरे व प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी उपस्थित होते. संत गाडगेबाबा व डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमाला सुरुवात झाली. प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी यांनी प्रास्ताविकातून वरिष्ठ लिपिक मनीष सावरकर यांच्या सबंध कार्यसेवेचा परामर्श घेऊन त्यांना पुढील आयुष्यासाठी भरभरुन शुभकामना दिल्या.

महाविद्यालयाच्या वतीने मनीष सावरकर यांचा सपत्नीक शाल, भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाचे डॉ.प्रशांत चर्जन, डॉ.दिनेश खेरडे, प्रा.सुधीर बानुबाकोडे व संस्थाध्यक्ष जगदीश काळे यांनी मनोगत व्यक्त करून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे व कार्यशैलीचे अनेक पैलू उपस्थितांसमोर मांडून त्यांना आनंदी, सुखी व निरामय जीवनाच्या भरभरुन शुभकामना दिल्या. वरिष्ठ लिपिक मनीष सावरकर यांनी मनोगत व्यक्त करून संस्थेप्रती व महाविद्यालयाप्रती ऋण व्यक्त केले. ॲड. प्रभाकर सावरकर यांनी मनीष सावरकर यांच्या तीस वर्षाच्या कार्यसेवेवर प्रकाश टाकून महाविद्यालयाच्या विकासामध्ये त्यांचे असलेले मौलिक योगदान स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे संचालन मराठी विभाग प्रमुख डॉ.अविनाश धोबे तर आभार गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.लुंबिनी गणवीर यांनी मानले. कार्यक्रमाला अजिंक्य सावरकर, आस्था सावरकर, महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# पेस आयआयटी अँड मेडिकल येथे विद्यार्थ्यांनी साजरा केला शिक्षक दिन

■ (प्रतिनिधी वरूड दर्पण)

**वरुड** – स्थानिक पेस आयआयटी अँड मेडिकल वरुड येथे विद्यार्थ्यांनी शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा केला. डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीचे अवचित साधून या शिक्षक दिनाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी



शिक्षकांप्रती आपला आदर व्यक्त करत शिक्षकांचे मोठा उत्साहात स्वागत केले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती आदर व्यक्त करीत आपले मनोगत व्यक्त केले. शिक्षक हा विद्यार्थ्यांच्या यशस्वी जीवनाचा शिल्पकार आहे तसेच शिक्षक हा विद्यार्थ्याला त्याच्या यशाची शिखरे गाठण्याकरिता उपलब्ध असलेला एक ज्ञानाचा मार्ग आहे. शिक्षकांप्रती व्यवहारिक जगतापलीकडे आपली श्रद्धा आणि आपले समर्पण अत्यंत आवश्यक आहे असे मत विद्यार्थ्यांनी याप्रसंगी व्यक्त केले.

याप्रसंगी पेस आयआयटी व मेडिकल वरुडचे ब्रांच मॅनेजर अमरदीप खाडे, मॅथेमॅटिक्स फॅकल्टी सतीश कुमार सिंग, बायोलॉजी डिपार्टमेंटच्या सौ अर्चना फुटाणे मॅडम, फिजिक्स डिपार्टमेंटचे प्रा.विकास पटेल, केमिस्ट्री डिपार्टमेंटचे प्रा.प्रिन्स गौतम, मयुरी धवड, मयुरी ठाकरे, प्रणव बोंडे, दीपक नाडगे, लोकेश शेळके यांची उपस्थिती होती.

प्राध्यापक सतीश कुमार सिंग यांनी सुद्धा याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करीत पुढील शैक्षणिक क्षेत्रात येणारी नवी आव्हाने व त्या प्रति विद्यार्थ्यांची जागरुकता या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संचालन युक्ती देवघरे हिने व निशिका पांडे यांनी केले.

# ठोस पुरावा दिल्यास पद सोडणार : भीमनवार यांचे प्रत्युत्तर

■ (प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई** – 'महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची (एमपीएससी) प्रतिष्ठा अबाधित राहावी आणि प्रयत्नांची पराकाष्ठा करणाऱ्या विद्यार्थ्यांना यथोचित न्याय मिळावा यासाठी पारदर्शी तसेच निष्पक्ष अशीच व्यवस्था उभारण्याचा माझा प्रयत्न आहे. तथापि माझ्याविरोधात कुणी एक जरी पुरावा दिला, तर एक क्षणसुद्धा मी या पदावर राहणार नाही', अशा शब्दांत 'एमपीएससी'चे अध्यक्ष विवेक भीमनवार यांनी सोमवारी आपल्यावर होत असलेल्या आरोपांना प्रत्युत्तर दिले. 'एमपीएससी'च्या परीक्षा प्रक्रियेतील कथित गैरप्रकार आणि पेपरफुटीच्या आरोपांवरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर भीमनवार यांनी सोमवारी आपली भूमिका स्पष्ट केली. विरोधी पक्षाकडून भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे.

न.प. प्राथमिक शाळा क्र.१ मध्ये

# गोकुळाष्टमी उत्साह आणि भक्तीमय वातावरणात साजरी

■ (प्रतिनिधी वरूड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – नगर परिषद प्राथमिक शाळा क्र.१ येथे काल गोकुळाष्टमीचा सण मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला.



या निमित्ताने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विविध मनोरंजक व सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. उत्सवाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या राधा-कृष्ण स्पर्धेत प्री-प्रायमरी गट आणि इयत्ता पहिली व दुसरीच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. रंगीबेरंगी पोशाख, हातात बासरी आणि डोक्यावर मोरपीस लावून सजलेले हे बालगोपाळ सर्वांचे लक्ष वेधून घेतले तर दुसरीकडे, इयत्ता तिसरी, चौथी आणि पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी थरारक दहीहंडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. 'गोविंदा रे गोपाळा'च्या गजरात विद्यार्थ्यांनी रचलेले मानवी मनोरे आणि दहीहंडी फोडतानाचा त्यांचा उत्साह उपस्थितांची मने जिंकले.

या संपूर्ण कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच सर्व सदस्य प्रमुख अतिथी म्हणुन उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवत त्यांना गोकुळाष्टमीच्या शुभेच्छा दिल्या. स्पर्धेचे अचूक आणि निष्पक्ष परीक्षण करण्यासाठी न.प. शाळा क्रमांक ४ च्या शिक्षिका भावना मेंढे व नेहा जाधव यांनी परीक्षक म्हणुन उपस्थित राहून आपली जबाबदारी अतिशय चोखपणे पार पाडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक आशिष तडस होते.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी शिक्षक साहेबराव उईके, विजय बेलसरे, संदीप कोकाटे, सविता बोबडे, भाग्यश्री चौधरी, शालिनी फरकाडे, सुनीता उपासे, मीनल गोरडे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी हर्षदा श्रीखंडे व अनिता दुपारे यांनी उपस्थित राहून आपले बहुमूल्य योगदान दिले.

स्वामी विवेकानंद मानवता गुरुकुल ढगा येथे

# शिक्षक दिन मोठ्या आनंदात व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा

■ (प्रतिनिधी वरूड दर्पण)

**वरुड** – कलाजीवन बहुउद्देशीय संस्था द्वारा संचालित स्वामी विवेकानंद मानवता गुरुकुल ढगा येथे माजी राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त ५ सप्टेंबर शिक्षक दिन मोठ्या आनंदात व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.



यंदा शिक्षक दिनाचे खास आकर्षण म्हणजे के.जी.२ च्या चिमुकल्यांना एक दिवसाचे शिक्षक बनवण्यात आले होते. सर्व चिमुकले शिक्षकांच्या वेशभूषेत, हातात पुस्तक, खडू घेऊन गुरुकुलमध्ये दाखल झाले होते. तर इतर सर्व विद्यार्थी गुरुकुलच्या गणवेशात उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मैदानावर चिमुकल्या शिक्षकांनी सादर केलेल्या प्रार्थनेने झाली. त्यानंतर डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. पाहुण्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहुल गुल्हाणे तर प्रमुख पाहुणे म्हणुन संस्थाध्यक्ष तथा चित्रकार युवराज ठाकरे, गुरुकुलचे संस्थापक रंजित इंगोले, मुख्याध्यापक नितीन ठाकरे मंचावर उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी शिक्षकांचे जीवनातील महत्त्व, गुरुकुलची मानवता व संस्काराची शिकवण यावर प्रकाश टाकला. चिमुकल्या शिक्षकांनी वर्गात जाऊन आपल्या मोठ्या दादा-ताईना शिकवण्याचा आनंद घेतला व सर्वांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

विद्यार्थ्यांनी शिक्षकांसाठी भाषणे, कविता सादर केल्या. कार्यक्रमाचे संचालन कविता वंजारी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी ऋतुजा घोरमाडे, रुपाली बघेल, हर्षा वंजारी, उदय घोरमाडे, ज्योती शेंडे व सर्व शिक्षक यांनी अथक परिश्रम घेतले.

# संपादकीय

**विचार करा, निर्णय घ्या आणि तुम्हाला जे योग्य वाटतं तेच करा.**

## वाघीण 'पिंकी'चा अंत : पण संघर्ष अजूनही जिवंत

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरात अनेक महिन्यांपासून चर्चेत असलेली वाघीण 'पिंकी' अखेर मृतावस्थेत आढळली आणि वनविभागाच्या एका मोठ्या मोहिमेचा शेवट झाला. तिच्या मृत्यूने एका वाघिणीचा प्रवास संपला; मात्र माणूस आणि वन्यजीव यांच्यातील संघर्षाचा प्रश्न तसाच उभा राहिला आहे. पिंकीला केवळ 'नरभक्षक' म्हणून पाहणे सोपे आहे; पण तिची कहाणी जंगलांचे आकुंचन, वाढते मानवी अतिक्रमण आणि वनव्यवस्थापनातील आव्हाने यांचीही आहे. मेळघाट हा महाराष्ट्रातील महत्त्वाचा व्याघ्र अधिवास आहे. येथे वाघांची संख्या वाढत असताना त्यांच्या अधिवासावर मानवी दबावही वाढत आहे. जंगलालगतच्या गावांमध्ये शेती, गुरे चारणे, सरपण गोळा करणे आणि जंगलावर अवलंबून असलेले दैनंदिन जीवन यामुळे माणूस आणि वाघ यांचा संपर्क अपरिहार्य ठरतो. अशा परिस्थितीत पिंकीच्या हल्ल्यांची मालिका सुरू झाली आणि भीतीचे सावट संपूर्ण परिसरावर पसरले. वनविभागाच्या नोंदीनुसार पिंकीच्या हल्ल्यांमध्ये सहा जणांचा मृत्यू झाला होता. या घटनांमुळे मेळघाटातील अनेक गावांमध्ये नागरिकांनी संताप व्यक्त केला, रस्ते रोखले आणि तातडीने कारवाईची मागणी केली. प्रत्येक मृत्यू हा एका कुटुंबाचा आधार हिरावून नेणारा होता. शेतात काम करणारे, जंगलात सरपणासाठी गेलेले किंवा रोजच्या उदरनिर्वाहासाठी बाहेर पडलेले लोक एका क्षणात मृत्यूच्या विळख्यात सापडले. त्यामुळे पिंकीचे नाव लोकांच्या मनात दहशतीचे प्रतीक बनले. पिंकीच्या हल्ल्यांतील बळी वनविभागाने जाहीर केलेल्या घटनांनुसार तिच्या हल्ल्यांमध्ये सहा जणांचा मृत्यू झाला. हे सर्व बळी जंगलालगतच्या भागातील सामान्य नागरिक होते. पहिला बळी – जंगलालगतच्या शेतात काम करत असताना हल्ला. दुसरा बळी – जंगलात सरपण गोळा करताना हल्ला. तिसरा बळी – शेतीच्या कामासाठी गेलेल्या व्यक्तीवर हल्ला. चौथा बळी – जंगलाच्या कडेला हालचाल करताना हल्ला. पाचवा बळी – उदरनिर्वाहासाठी बाहेर पडलेल्या नागरिकाचा मृत्यू. सहावा बळी – शेवटच्या घटनेनंतर वनविभागाने तातडीची मोहीम तीव्र केली. या सर्व घटनांनी मेळघाट परिसरात भीतीचे वातावरण निर्माण केले आणि अनेक गावांमध्ये नागरिकांनी वनविभागाकडे तातडीच्या कारवाईची मागणी केली. मोठी शोधमोहीम पिंकीला जेरबंद करण्यासाठी वनविभागाने अनेक आठवडे मोठी मोहीम राबवली. प्रशिक्षित पथके, ड्रोन, कॅमेरा ट्रॅप, पिंजरे आणि हत्तींच्या मदतीने तिचा शोध सुरू होता. तिला भूल देऊन पकडण्याचाही प्रयत्न करण्यात आला; मात्र ती वारंवार ठिकाण बदलत असल्याने हे काम अत्यंत कठीण ठरले. अखेर ती मृतावस्थेत सापडली. प्राथमिक तपासात तिच्या मृत्यूमागील कारणांचा शोध घेण्यासाठी शवविच्छेदन करण्यात आले. तिचा मृत्यू नैसर्गिक होता की इतर कोणत्या कारणामुळे झाला, याचा तपास वनविभागाने केला. दोष फक्त वाघिणीचा का? या घटनेकडे केवळ एका नरभक्षक वाघिणीचा अंत म्हणून पाहणे योग्य ठरणार नाही.

**मेष** (21 मार्च – 19 एप्रिल)
प्रेम : नात्यात समंजसपणा ठेवा.
नोकरी : वरिष्ठांकडून कौतुक मिळेल.
आर्थिक : आर्थिक स्थिती सुधारेल.
आरोग्य : थकवा जाणवू शकतो.
शुभ रंग : लाल | शुभ अंक : 9

**वृषभ** (20 एप्रिल – 20 मे)
प्रेम : जोडीदारासोबत वेळ घालवाल.
नोकरी : कामात प्रगतीची संधी आहे.
आर्थिक : आर्थिक स्थिती सुधारेल.
आरोग्य : प्रकृती स्थिर राहील.
शुभ रंग : हिरवा | शुभ अंक : 6

**मिथुन** (21 मे – 20 जून)
प्रेम : संवादातून संबंध दृढ होतील.
नोकरी : नवीन जबाबदारी मिळेल.
आर्थिक : गुंतवणूकीसाठी दिवस चांगला.
आरोग्य : चांगली तब्येत राहील.
शुभ रंग : पिवळा | शुभ अंक : 5

**कर्क** (21 जून – 22 जुलै)
प्रेम : कुटुंबासोबत आनंदाचा क्षण.
नोकरी : कामात स्थिरता राहील.
आर्थिक : बचतीकडे लक्ष द्या.
आरोग्य : पचनाच्या तक्रारी संभवतात.
शुभ रंग : पांढरा | शुभ अंक : 2

**सिंह** (23 जुलै – 22 ऑगस्ट)
प्रेम : जोडीदारासोबत मतभेद टाळा.
नोकरी : नवीन प्रकल्प हाती घेईल.
आर्थिक : उत्पन्नांचे नवीन स्रोत मिळू शकतात.
आरोग्य : उर्जा चांगली राहील.
शुभ रंग : केशरी | शुभ अंक : 1

**कन्या** (23 ऑगस्ट – 22 सप्टेंबर)
प्रेम : भावनांवर नियंत्रण ठेवा.
नोकरी : मेहनतीचे फळ मिळेल.
आर्थिक : सुखसुविधा वाढतील.
आरोग्य : थकवा जाणवू शकतो.
शुभ रंग : जांभळा | शुभ अंक : 7

**तुला** (23 सप्टेंबर – 22 ऑक्टोबर)
प्रेम : नात्यात गोडवा वाढेल.
नोकरी : सहकाऱ्यांसोबत चांगले संबंध.
आर्थिक : आर्थिक लाभाची शक्यता.
आरोग्य : मनःशांती मिळेल.
शुभ रंग : गुलाबी | शुभ अंक : 6

**वृश्चिक** (23 ऑक्टोबर – 21 नोव्हेंबर)
प्रेम : नकारात्मक विचार टाळा.
नोकरी : मेहनत अधिक करावी लागेल.
आर्थिक : मोठा खर्च होऊ शकतो.
आरोग्य : तापाचा त्रास होऊ शकतो.
शुभ रंग : निळा | शुभ अंक : 8

**धनु** (22 नोव्हेंबर – 21 डिसेंबर)
प्रेम : नवीन ओळख संभवते.
नोकरी : कामात यश मिळेल.
आर्थिक : पैशांची आवक वाढेल.
आरोग्य : गुडघेदुखीची काळजी घ्या.
शुभ रंग : निळसर जांभळा | शुभ अंक : 3

**मकर** (22 डिसेंबर – 19 जानेवारी)
प्रेम : जोडीदाराचा विश्वास वाढेल.
नोकरी : स्थिर प्रगती होईल.
आर्थिक : नवे खर्च नियोजन करावे.
आरोग्य : अंगदुखीची शक्यता.
शुभ रंग : तपकिरी | शुभ अंक : 10

**कुंभ** (20 जानेवारी – 18 फेब्रुवारी)
प्रेम : भावना व्यक्त करण्यास यश.
नोकरी : नवे संधीचे दरवाजे उघडतील.
आर्थिक : उत्पन्नात वाढ होईल.
आरोग्य : सर्दी-खोकल्याची शक्यता.
शुभ रंग : आकाशी | शुभ अंक : 4

**मीन** (19 फेब्रुवारी – 20 मार्च)
प्रेम : जोडीदारासोबत रोमँटिक क्षण.
नोकरी : राजनैतिक कामात यश.
आर्थिक : आर्थिक स्थिती चांगली राहील.
आरोग्य : मानसिक तणाव टाळा.
शुभ रंग : गुलाबी | शुभ अंक : 11

# विवादे नैव कर्तव्यं प्रधानै : सह कर्हिचित

**आपल्या पक्षाच्या काळात अतिरेक्यांच्या दहशतीमुळे लाल चौकात तिरंगा फडकवला जात नव्हता, याची जाणीव युवराज राहुल गांधींना नक्कीच असेल. पण मोदी सरकारमुळे काश्मीर खोरे दहशतवादमुक्त झाले आहे हे मान्य करण्याचा मोठेपणा राहुल गांधींना दाखवता आला नाही.**



चाणक्य नीतीतील हे अवतरण आहे. चाणक्य नीतीनुसार विनाकारण विरोध करणाऱ्या लोकांशी कधीही वाद घालू नये. त्यांच्याशी वाद घातल्याने तुमचा वेळ आणि मानसिक शांतता दोन्ही नष्ट होते. चाणक्य नीतीच्या या अवतरणाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या १२ वर्षांत अत्यंत निष्ठेने पालन केले आहे. गेल्या १२ वर्षांत त्यांच्यावर विरोधकांनी अभद्र, गलिच्छ अशा भाषांच्या सर्व प्रकारात टीका केली. पण असल्या टीकेला नरेंद्र मोदी यांनी कधीच भीक घातली नाही. विकसित आणि आत्मनिर्भर भारताच्या उभारणीसाठी त्यांनी निर्धारपूर्वक वाटचाल सुरू आहे. मोदी सरकारच्या अलीकडील काही निर्णयांकडे दृष्टिक्षेप टाकला तर आपण समृद्ध राष्ट्र बनण्याच्या दिशेने कसे मार्गक्रमण करीत आहोत, याची कल्पना येऊ शकेल. रेल्वेमंत्री अश्विन वैष्णव यांनी अहमदाबाद–मुंबई बुलेट ट्रेनच्या पाठोपाठ हैदराबाद–मुंबई बुलेट ट्रेन प्रकल्पाची घोषणा केली. या प्रकल्पामुळे मुंबई–पुणे अंतर अवघ्या ५० मिनिटांत पार करता येणार आहे. हा प्रकल्प प्रत्यक्षात आल्यावर मुंबई–हैदराबाद प्रवास अवघ्या सव्वातीन तासांत पूर्ण होईल. सध्या या प्रवासाला किमान १० तास लागतात. २०१४ पूर्वी बुलेट ट्रेनसारख्या प्रकल्पांची भारतातील जनतेने कल्पनाही केली नव्हती. मुंबई–हैदराबाद बुलेट ट्रेनची माहिती देताना रेल्वे मंत्री वैष्णव यांनी मालवाहतुकीसाठी उभारण्यात आलेल्या पूर्व–पश्चिम स्वतंत्र रेल्वे मार्ग प्रकल्पाचे काम सुरू झाल्याची माहितीही दिली. स्वतंत्र रेल्वेमार्ग असल्याने औद्योगिक उत्पादने, शेतमाल तसेच अन्य वस्तूंची वाहतूक वेगाने होऊ शकणार आहे.


सुरत–दानकुनी (पश्चिम बंगाल) असा २ हजार ५२ किलोमीटर लांबीचा हा मार्ग पश्चिम बंगाल, ओदिशा, छत्तीसगड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात या सहा राज्यांना जोडणारा आहे. हा फ्रिट कॉरिडॉर हा देशाच्या विकासाच्या वाटचालीतील अभिमानाचा प्रकल्प असणार आहे. राहुल गांधींसारखे विरोधक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना कोंडीत पकडण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत असताना, त्यासाठी कोणत्याही थराला जात असताना पंतप्रधान मोदी अत्यंत शांतपणे देशाच्या विकासाचे एक एक प्रकल्प मार्गी लावत आहेत. पंतप्रधानांनी अलीकडेच वीस स्पेस स्टार्टअप्सच्या सीईओ आणि संस्थापकांशी संवाद साधला. अंतराळ संशोधन क्षेत्र खासगी क्षेत्रासाठी खुले करण्याचा निर्णय मोदी सरकारने घेतला आहे. त्याचा फायदा घेत हैदराबाद येथील स्कायरूट एरोस्पेस या भारतीय खासगी अंतराळ कंपनीने विकसित केलेले विक्रम–१ या देशातील पहिले खासगी ऑर्बिटल रॉकेटचे श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रावरून अलीकडेच यशस्वीरीत्या अवकाशात प्रक्षेपण झाले आहे. भारतीय तरुणांनी स्वतः तयार केलेल्या नव्या रॉकेटच्या साह्याने देशी–विदेशी उपग्रह अवकाशात उड्डाण घेणार आहेत. संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने (डीआरडीओ) लडाखमधील न्योमा येथे जगातील सर्वात उंचावरील ड्रॉप झोनमध्ये 'मिलिटरी कॉम्बॅट पॅराशूट सिस्टीम'ची (एमसीपीएस) २२,००० फुटांवरून यशस्वी चाचणी घेतली आहे. अत्यंत प्रतिकूल हवामानात पार पडलेल्या या चाचणीमुळे भारताच्या स्वदेशी संरक्षण क्षमतेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. भारतीय हवाईदलाने नुकताच न्योमा येथे लढाऊ विमानांच्या संचलनासाठी जगातील सर्वात उंचावरील हवाईतळ सुरू केला आहे. यापूर्वीही न्योमा येथे सैन्य, वाहने आणि युद्धसामग्री पॅरा–ड्रॉप करण्याच्या अनेक मोहिमा पार पडल्या आहेत. या सर्व घटना प्रत्येक भारतीयाची मान उंचावणाऱ्या ठरल्या आहेत. एकीकडे अशी घोडदौड चालू असताना देशाच्या अर्थव्यवस्थेने इराण–अमेरिका युद्धासारख्या अनेक संकटांवर मात करत, अडथळे दूर करत ७.०८ टक्क्यांचा विकास दर गाठला आहे.


होर्मुझ खाडी बंद झाल्यामुळे देशाच्या इंधन पुरवठ्याची साखळी संकटात आली होती. इंधनाचे दर आकाशाला भिडण्याचा धोका होता. मात्र मोदी सरकारने आपले राजकीय आणि परराष्ट्र संबंधाचे कौशल्य पणाला लावल्यामुळे या संकटाचा देशाला कमीत कमी फटका बसला. अलीकडेच भारत–युरोपीय महासंघ मुक्त व्यापार करार झाल्यामुळे भारताची अर्थव्यवस्था आणखी मजबूत होणार आहे. युरोपीय महासंघातले सर्व २७ देश या कराराच्या बाजूने आहेत आणि आवश्यक औपचारिक बाबी पूर्ण करून हा करार लवकरात लवकर अंमलात आणण्यास उत्सुक आहेत. सेमीकंडक्टर उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी सुरू असलेल्या भारताच्या महत्त्वाकांक्षी कार्यक्रमाची आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रशंसा होत आहे. सेमीकॉन इंडियाची पहिली आवृत्ती जगभरातील गुंतवणूकदारांच्या सहभागातून यशस्वी झाली होती, तर दुसरी आवृत्ती, सेमीकॉन इंडिया २.०, नुकतीच १४ अब्ज डॉलरच्या गुंतवणुकीसह सुरू करण्यात आली आहे. या संपूर्ण मोहिमेमुळे भारतातील सेमीकंडक्टर क्षेत्रात सुमारे ७० अब्ज डॉलरच्या गुंतवणुकीला चालना मिळेल.

'जंतरमंतर'वर गोंधळ घालण्यात धन्यता मानणाऱ्या, संसद बंद पाडण्यात पुरुषार्थ मानणाऱ्या राहुल गांधींना आपल्या देशाची ही प्रगतीमय वाटचाल ठाऊक नाही असे म्हणता येणार नाही. याच राहुल गांधींनी २९ जानेवारी २०२३ रोजी श्रीनगरच्या लाल चौकात जाऊन तेथे ध्वजारोहण केले होते. त्याची छायाचित्रेही प्रसिद्ध केली नव्हती. आपल्या पक्षाच्या काळात अतिरेक्यांच्या दहशतीमुळे लाल चौकात तिरंगा फडकवला जात नव्हता, याची जाणीव युवराज राहुल गांधींना नक्कीच असेल. पण मोदी सरकारमुळे काश्मीर खोरे दहशतवादमुक्त झाले आहे हे मान्य करण्याचा मोठेपणा राहुल गांधींना दाखवता आला नाही. अशा विरोधकांकडे दुर्लक्ष करीत देशाला प्रगतीची नवनवी शिखरे गाठून देणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदींचे मोठेपण आणखी उठून दिसते. विरोधकांच्या टीकेला उत्तर देत बसण्यापेक्षा आपल्या कृतीतून देशाची प्रगती साधण्याचा मार्ग त्यांनी पत्करला आहे.

# मैदान 'अशुद्ध' की मानसिकता?

**भारताची खरी प्रगती केवळ चंद्रावर तिरंगा पोहोचवण्यात नाही, तर प्रत्येक भारतीयाच्या मनातील जातीय भिंती उद्ध्वस्त करण्यात आहे. दलित, आदिवासी आणि मागासवर्गीयांच्या स्पर्शामुळे एखादे मैदान 'अशुद्ध' होते, असा विचार करणाऱ्या मानसिकतेचे शुद्धीकरण हीच खरी गरज आहे.**



चंद्रावर तिरंगा पोहोचवणाऱ्या भारतात जर आजही जातीभेद आणि अस्पृश्यता पाळली जात असेल, तर ही केवळ सामाजिक शोकांतिका नाही; ती आपल्या प्रगतीच्या दाव्यांवरची काळी रेघ आहे. हजारो जाती, अनेक धर्म, भाषा, संस्कृती आणि परंपरांनी समृद्ध असलेल्या या देशाला एकसंध राष्ट्र म्हणून उभे करण्याचे सामर्थ्य भारतीय संविधानाने दिले. धर्म, जात, भाषा, प्रदेश किंवा लिंग कोणतेही असो, प्रत्येक नागरिक समान असून सर्वांना समान अधिकार आहेत आणि प्रत्येकाच्या प्रतिष्ठेचे रक्षण झाले पाहिजे, हा संविधानाचा स्पष्ट संदेश आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली घडलेल्या संविधानाने शतकानुशतके माणसाला माणसापासून तोडणाऱ्या सामाजिक विषमतेला मूठमाती देत प्रत्येक भारतीयाला माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला. मात्र स्वातंत्र्याच्या आठ दशकांनंतरही दलिताने भांड्याला हात लावला म्हणून मारहाण, मिशी ठेवली म्हणून हल्ला, मंदिरात प्रवेश केला म्हणून अपमान, घोड्यावर बसून लग्नाची वरात काढली म्हणून दगडफेक केली जात असेल, तर संविधानाने दिलेल्या समानतेच्या हमीसमोर वास्तव किती विदारक आहे, हे स्पष्ट होते. त्याहून गंभीर बाब म्हणजे दलित समाजातून आलेले राज्यसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी सभा घेतलेल्या जागेचे 'शुद्धीकरण' केले जात असेल, तर हा प्रकार केवळ एका व्यक्तीचा अपमान म्हणून पाहता येणार नाही; ते संविधानाच्या समतेच्या मूल्यांनाच दिलेले आव्हान आहे.

'शुद्धीकरण' जागेचे की मानसिकतेचे? उत्तराखंडमधील हल्द्वानी येथे राज्यसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या सभेनंतर रामलीला मैदानावर करण्यात आलेल्या 'शुद्धीकरणा'ने जातीयवाद आणि अस्पृश्यतेचे भयंकर रूप दाखवून दिले आहे. खर्गे यांनी हा मुद्दा राज्यसभेत उपस्थित केला. केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी अशा प्रकारांना पक्षाची मान्यता नसल्याचे स्पष्ट करत चौकशीची भूमिका घेतली; मात्र त्यानंतर उत्तराखंड भाजपचे अध्यक्ष महेंद्र भट्ट यांनी या प्रकाराचे समर्थन केले. घटनेला तीन आठवडे उलटूनही अद्याप उत्तराखंडमधील भाजप सरकारने त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला नाही. भाजप नेतृत्वाने काही कारवाई केली नाही किंवा या घटनेचा साधा निषेधही केला नाही. भारतीय संविधानाच्या कलम १७ ने अस्पृश्यता नष्ट केली असून तिच्या कोणत्याही स्वरूपातील आचरणाला कायद्याने मनाई केली आहे. त्यामुळे संविधानाच्या दृष्टीने प्रश्न केवळ एखादी प्रथा पाळली किंवा नाही एवढाच नाही; तर माणसाला त्याच्या जातीमुळे कनिष्ठ, अपवित्र किंवा अस्पृश्य मानण्याची मानसिकता आपण खरोखर सोडली आहे का? हा आहे. एखाद्या दलित व्यक्तीच्या उपस्थितीने जागा 'अशुद्ध' होते, असा विचार जिथे जन्म घेतो, तिथे केवळ एका व्यक्तीचा अपमान होत नाही, तर तिथे संविधानाच्या समता, प्रतिष्ठा आणि बंधुतेच्या मूलभूत मूल्यांनाच आव्हान दिले जाते. त्यामुळे आज प्रश्न मैदानाच्या 'शुद्धीकरणा'चा नाही; प्रश्न आहे जातीय विषाने ग्रासलेल्या मानसिकतेचे शुद्धीकरण कधी होणार?

पंतप्रधानांचे मौन मनुवादाला पाठबळ देणारे मल्लिकार्जुन खर्गे यांच्या बाबतीत घडलेल्या 'शुद्धीकरणा'च्या या वादग्रस्त प्रकारावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अद्याप एक शब्दही उच्चारलेला नाही. देशाच्या सर्वोच्च नेतृत्वाने मनुवादी मानसिकतेला ठाम विरोध करण्याऐवजी मौन बाळगणे म्हणजे त्या मानसिकतेला अप्रत्यक्षपणे बळ देणे आणि सामाजिक न्यायाच्या लढ्याला कमजोर करणे होय. संविधानाच्या समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या मूल्यांचे रक्षण करण्यासाठी पंतप्रधानांनी या प्रकाराचा स्पष्ट आणि निःसंदिग्ध निषेध करणे, तसेच दोषींवर कठोर कारवाईचे आदेश देणे आवश्यक होते. पण दुर्दैवाने अद्याप ते झाले नाही. जातीय भेदभावाच्या प्रश्नावर सत्तेचे मौन हे तटस्थता नसते; ते अन्यायाविरोधात उभे राहण्याची जबाबदारी झटकणे असते. अशा मौनामुळे भेदभाव करणाऱ्यांचे धैर्य वाढते. चोर सोडून संन्याशाला फाशी शुद्धीकरणप्रकरणी भारतीय जनता पक्षाचे उत्तराखंडमधील सरकार आणि भाजपचे केंद्रीय नेतृत्व अस्पृश्यता पाळून गुन्हा करणाऱ्या आपल्या नेते आणि कार्यकर्त्यांविरोधात कोणतीही कारवाई केलेली नाही. पण उलट या प्रकरणी कारवाई होत नाही म्हणून आवाज उठवणारे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर उत्तराखंडमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यावरून जातीभेद, अस्पृश्यता याबाबत भाजपची मानसिकता काय आहे हे दिसून येते.

जालन्यातील घटना अधिक भयावह जालना जिल्ह्यातील एक घटना या प्रश्नाला आणखी गंभीर बनवते. एका दलित व्यक्तीला गोरक्षकांनी मारहाण केली, जातीवाचक शिवीगाळ केली आणि त्याच्या तोंडात जबरदस्तीने शेण कोंबले. त्याच्या अल्पवयीन मुलालाही धमकावले, त्यालाही शेण खाऊ घालण्याचा प्रयत्न केला. मे महिन्यात घडलेल्या या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर या प्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. सत्ताधाऱ्यांनी जन्माला घातलेली गोरक्षक नावाची नवी जमात कायदा आणि सुव्यवस्थेला वारंवार आव्हान देत आहे. सत्तेच्या आशीर्वादामुळे त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नसल्याने त्यांनी राज्यभरात धुडगूस घातला आहे.

घटनात्मक सर्वोच्च पदालाही जातीभेदाचे ग्रहण देशाचे माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद आणि विद्यमान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याशी पुरीच्या जगन्नाथ मंदिरात घडलेल्या वादग्रस्त घटनांनी जात आणि सामाजिक प्रतिष्ठेच्या मुद्द्याचा गंभीर प्रश्न निर्माण केला आहे. रामनाथ कोविंद यांच्या २०१८ मधील जगन्नाथ मंदिर भेटीदरम्यान सेवकांकडून त्यांच्या आणि त्यांच्या पत्नीशी कथित गैरवर्तन झाल्याचे समोर आले; तर २०२३ मध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या जगन्नाथ मंदिर भेटीनंतर त्यांच्या प्रवेशाबाबत जातीय भेदभावाचे आरोप झाले.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक – चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# विद्यार्थी न्याय हक्कासाठी रस्त्यावर उतरले, अन नरेंद्र मोदी खिदीखिदी हसतात : एमपीएससी वरून संजय राऊत संतापले : 'दिमागी नक्षल...'

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या भोंगळ कारभाराविरोधात आणि पेपरफुटीच्या निषेधार्थ राज्यातील विद्यार्थी आक्रमक झाले आहेत. काल पुण्यात चझडउ विद्यार्थ्यांनी ओंकारेश्वर मंदिर ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत धडक मोर्चा काढला. विशेष म्हणजे, या मोर्चात राजकीय पक्षांच्या नेत्यांनीही सहभाग नोंदवला. तर दुसरीकडे, कोल्हापुरातील दसरा चौकात संतप्त विद्यार्थ्यांनी जोरदार निदर्शनं करत एमपीएससी अध्यक्ष आणि सचिवांच्या तातडीने राजीनाम्याची मागणी केली. या वाढत्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते संजय राऊत यांनी राज्य सरकारवर तीव्र शब्दांत ताशेरे ओढले आहेत. 'सध्या लोकसेवा आयोगाची रचना अत्यंत राजकीय स्वरूपाची झाली असून आयोगाचे पूर्णपणे अधपतन झाले आहे,' असा घणाघाती आरोप राऊत यांनी केला. सजय राऊत म्हणाले की, मुळात लोकसेवा आयोगाची जी रचना आहे, ती अत्यंत राजकीय स्वरूपाची आहे. कोणते निकष लावून माणसे नेमली जातात, याची आचारसंहिता आहे. मुंबईचे पोलीस आयुक्त असणारे बापट सुद्धा चेअरमन होते. लोकसेवा आयोगाचे आज अध:पतन झाले आहे. कोणतेही विद्यापीठ, देशातल्या शैक्षणिक संस्था यावर नेमलेली माणसे ही एका राजकीय विचाराची आहेत. त्यांची कुवत तिथे बसण्याची नाही. लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष कोण आहेत हे मला माहीत नाही. पहिले माहिती असायचे. पण, आता माहीत नाही, असे त्यांनी म्हटले.

या अशा कमिट्यांनी काय होणार आहे? मुळात राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी स्वत:ला या राज्याचे मुख्यमंत्री म्हणून काही बाबतीत तरी निष्पक्ष होत काही संविधानिक संस्थांमध्ये राजकीय लोक किंवा आपल्या मर्जीतले माणसं उतरवण्याचे काम ते ज्या दिवशी बंद करतील त्या दिवशी विद्यार्थ्यांना न्याय मिळेल, असे म्हणत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधला.

## दिनविशेष

०८/०९/१९६२ : स्वातंत्र्य मिळालेल्या अल्जीरियाने नवीन संविधान अंगीकारले.

## सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -१५३५९० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने - १४०६९०रु.(१०ग्रॅम)

चांदी - २,३५,४०० रु. (प्र.किलो)

## कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी | १६५० | २००० |
| गहू | २५०० | २७०० |
| तूर | ८३०० | ८९५० |
| मूग | ६८०० | ७३०० |
| उडीद | ६७०० | ७३०० |
| हरभरा | ५८५० | ६२७५ |
| सोयाबिन | ५३५० | ५८२३ |
| बाजरा | २४०० | २६०० |
| तिळ | ११००० | ११७०० |
| भुईमूग | ५१५० | ५३५० |
| मका | १७०० | १८०० |

### आदर्श इंग्लिश कॉन्व्हेंट मध्ये

# कृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – नवयुवक शिक्षण संस्था अंतर्गत आदर्श इंग्लिश कॉन्व्हेंट मध्ये येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला यावेळी विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण व राधेच्या आकर्षक वेशभूषेत उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या जीवनावर आधारित सुंदर सादरीकरण नृत्य व गीते सादर केली तसेच कृष्णाच्या जीवनातील प्रसंगांचे वर्णन करण्यात आले. यामध्ये पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी सुद्धा उत्साहपूर्ण आनंद घेतला. शिक्षिका



मोनिका वानखडे यांनी कार्यक्रमाचे संचालन केले. मुख्याध्यापिका निता चिमोटे आणि आदर्श मराठी शाळेचे मुख्याध्यापक नितेश वाघमारे यांनी श्रीकृष्ण पूजन आणि दीप प्रज्वलन केले, नंतर सहशिक्षिका लिना पवार व वनिता अकर्ते यांनी दहीहंडीचे पूजन केले. यावेळी यशोदा कृष्ण स्पर्धा घेण्यात आली. यामध्ये माता पालकांनी उत्तम प्रतिसाद दिला. प्रिती धार्मिक, दिपाली काळे यांनी विविध कार्यक्रम सादर केले.

यानंतर गोविंद आला रे आला, या गीताने सारा परिसर भक्तीमय केला आणि लहान्यापासून तर मोठ्यापर्यंत अनेकांनी या दहीहंडीचा आस्वाद घेतला. यावेळी गोपाळकाल्याचे वाटप करण्यात आले. शेवटी बक्षीस वितरण करण्यात आले. यशोदा कृष्ण स्पर्धेमध्ये सहभाग घेतलेल्या माता, पालकांना प्रमाणपत्र व शाळा करुन भेट वस्तू देण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता मुख्याध्यापिका निता चिमोटे, शिक्षक सिनकर, प्रिती धार्मिक, दिपाली काळे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी व पालकांचे सहकार्य लाभले.

### महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय येथे

# कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी स्वयंशासन दिन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय येथे प्राचार्य डॉ.दिलीप हांडे यांच्या मार्गदर्शनात व प्रमुख उपस्थितीत कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वयंशासन दिन उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन मोठ्या आनंदाने साजरा केला. शिक्षक दिनानिमित्त कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षकांनी संपूर्ण दिवसाचे अध्यापन व प्रशासनकार्य याचा अनुभव घेतला. स्वयंशासित महाविद्यालय या उपक्रमात प्राचार्य म्हणून सुजल कळमकर, उपप्राचार्य खुशी आमोदे, पर्यवेक्षक दिव्यांशु जोगेकर, सुजल सोनुले, चेतन मेश्राम यांनी कार्यभाग सांभाळला तर




एकूण ३५ विद्यार्थी शिक्षक म्हणून सहभागी झाले होते. त्यानंतर महाविद्यालयाच्या सभागृहात शिक्षकांप्रती आदर व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी स्वागत समारंभ आयोजित केला. या कार्यक्रमाची सुरुवात महामानवांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.दिलीप हांडे तर प्रमुख उपस्थितीत संस्थेचे आजीवन सदस्य प्रा.अशोक घोरमाडे, पर्यवेक्षिका अलका पवार व विद्यार्थी प्रशासनातील प्राचार्य, पर्यवेक्षक उपस्थित होते. त्यानंतर महाविद्यालयातील सर्व शिक्षकांना विद्यार्थ्यांनी



पुष्पगुच्छ देऊन आदरपूर्वक सन्मानित केले. यावेळी चैताली सुरजुसे, लव शेळके,जानवी कनाटे, तनिष्का काकडे, कल्याणी भोंडे, कोमल कडू, विद्यार्थी प्राचार्य सुजल कळमकर या विद्यार्थी शिक्षकांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ.दिलीप हांडे यांनी शुभेच्छा देऊन स्वयंशासन दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी अध्यापन व प्रशासनकार्य उत्कृष्टपणे सांभाळले याबद्दल मनापासून कौतुक केले.

कार्यक्रमाचे संचालन अश्विनी मांडोकर व मोनाली घाटोळे तर आभार जान्हवी काळे या विद्यार्थीनीने केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठीचे कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षिका यांनी परिश्रम घेतले. यावेळी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

### न्यू इंग्लिश प्राथमिक शाळेत

# श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात साजरी

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – न्यू इंग्लिश प्राथमिक शाळा येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव अत्यंत उत्साहपूर्ण, आनंददायी व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमासाठी नर्सरी ते इयत्ता दुसरीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी राधा व श्रीकृष्णाची सुंदर वेशभूषा करून शाळेत हजेरी लावली. रंगीबेरंगी पोशाख, मुकूट, मोरपिसे आणि पारंपरिक वेशभूषेतील हे चिमुकले राधा-कृष्ण सर्वांचे आकर्षण ठरले. त्यांच्या निरागस हास्याने व उत्साहाने कार्यक्रमाला विशेष शोभा प्राप्त झाली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मुख्याध्यापिका कोमल पांडव यांचे हस्ते श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करण्यात आले. कार्यक्रमातील विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी सादर केलेली विविध सांस्कृतिक सादरीकरणे. इयत्ता दुसरीच्या विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण जन्माष्टमीवर आधारित सुंदर नृत्य सादर



केले. त्यांच्या तालबद्ध नृत्याने आणि उत्स्फूर्त अभिनयाने उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला सर्वांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.

याच दिवशी ५ सप्टेंबर हा भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन असल्यानेत्यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. विद्यार्थ्यांना डॉ.राधाकृष्णन यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती देण्यात आली. शिक्षकांचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्व आणि शिक्षक-विद्यार्थी यांच्यातील प्रेमाचे नाते याविषयीही मार्गदर्शन करण्यात आले.

या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन शाळेतील सर्व शिक्षकांनी एकत्रितपणे अतिशय सुंदर पद्धतीने केले. विद्यार्थ्यांना कार्यक्रमासाठी मार्गदर्शन, सराव आणि आवश्यक तयारी करुन देण्यात शिक्षकांनी विशेष मेहनत घेतली.

# कोरोना लसीमुळे कर्करोग अन हृदयविकाराचा झटका येण्याचे प्रमाण वाढले

### आमदार नाना पटोलेंचा खळबळजनक दावा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**गोंदिया** – कोरोना प्रतिबंधक लस घेतल्यानंतर लोकांमध्ये कर्करोग (कॅन्सर) आणि हृदयविकाराच्या झटक्याचे (हार्ट अटॅक) प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे, असा




खळबळजनक आणि गंभीर आरोप काँग्रेसचे नेते तथा आमदार नाना पटोले यांनी केला आहे. गोंदिया जिल्ह्यातील आमगाव येथे आयोजित एका जाहीर कार्यक्रमात कार्यकर्त्यांना आणि नागरिकांना संबोधित करताना त्यांनी हे वक्तव्य केले. आपल्या भाषणात नाना पटोले म्हणाले की, देशात कोरोना महामारीच्या काळात मोठ्या प्रमाणावर लसीकरण मोहीम राबवण्यात आली. मात्र, या लशीचे अत्यंत घातक परिणाम आता समोर येऊ लागले आहेत. कोरोना लस घेतलेल्या नागरिकांमध्ये अचानक हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यू होण्याचे तसेच कर्करोगासारखे गंभीर आजार जडण्याचे प्रमाण वेगाने वाढले असल्याचा दावा त्यांनी केला. केंद्र सरकारच्या तत्कालीन धोरणांवर आणि आरोग्य व्यवस्थेवर निशाणा साधत त्यांनी या गंभीर मुद्द्याकडे लक्ष वेधले.

### माध्यमिक विद्यालय कला वाणिज्य व्यावसायिक अभ्यासक्रम कनिष्ठ महा.येथे

# शिक्षक दिन, वृक्षारोपण व दहीहंडी उत्सवाचे आयोजन

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**लोणी** – अप्पर वर्धा प्रकल्पग्रस्त वेलफेअर सोसायटी अमरावती द्वारा संचालित माध्यमिक विद्यालय कला वाणिज्य व्यावसायिक अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालय येथे राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त 'शिक्षक दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या वर्षीच्या शिक्षक दिनानिमित्त शाळेत 'एक पेड़ मां के नाम' उपक्रमांतर्गत वृक्षारोपण समारंभ व दही हंडीचे उत्साहात असा त्रिवेणी संगम असलेला कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापिका एस.एम.दुर्योधन तर विशेष अतिथी म्हणुन पालक-शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा



दुर्गा धोटे, सदस्य सुरेखा परतेती, रामराव धोटे, ज्योती परतेती, प्रतिभा कुमरे, प्रियंका मारबदे, लता बोरवार, शितल राऊत, एन.व्ही.वडनेरकर, एन.एस.वडनेरकर, सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन हारार्पण दीपप्रज्वलन करुन अभिवादन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी शिक्षिका समीक्षा कुबडे, नम्रता पोहरकर व मयुरी भालेकर यांच्या संकल्पनेतून राघीनी वानखडे, वृषभ कुमरे, नंदिनी हिवसे यांनी सहभाग घेत दही हंडी फोडली.

विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या मानवी मनोर्याने उपस्थित आमचे लक्ष वेधून घेतले गोविंदा आला रे च्या तालावर विद्यार्थ्यांनी ठेका धरला आणि संपूर्ण शाळेच्या प्रांगणात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले यावर्षीच्या शिक्षक दिनानिमित्त शाळेने दोन महत्त्वाच्या गोष्टी एकत्रितपणे साजरा केल्या पर्यावरण संवर्धन 'एक पेड़ मां के नाम' उपक्रमातून शाळेच्या प्रांगणात मान्यवरांच्या हस्ते फलदार व सदाहरित झाडे लावुन पर्यावरण संरक्षणाचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी व पालक यांनी हजेरी लावली. या कार्यक्रमाचे प्रास्तविक सानिका बोरकर, संचालन आयेशा शेख व साक्षी बरगट तर उपस्थितांचे आभार अनुष्का बेलसरे हिने मानले.

# डीजे, लेझर, सोशल मीडियावर नजर : नियमांचे उल्लंघन केल्यास कारवाईचा इशारा, मिरवणूक, विसर्जनाबाबत पोलिसांच्या मंडळांना सूचना

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**जव्हार** – गणेशोत्सव शांततेत, उत्साहात आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवत पार पाडण्यासाठी जव्हार पोलीस ठाण्याच्यावतीने सोमवारी तहसील कार्यालयात गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांसह



नागरिकांची बैठक घेण्यात आली. गणेशमूर्ती स्थापना, मिरवणूक, विसर्जन, डीजेचा आवाज, लेझर लाइट तसेच समाजमाध्यमांवरील आक्षेपार्ह संदेशांबाबत पोलिसांनी स्पष्ट सूचना देत नियमभंग करणाऱ्यांवर कारवाईचा इशारा दिला.

नियमांचे काटेकोर पालन गणेश मंडळांचे अध्यक्ष व सदस्य, पोलीस मित्र, ज्येष्ठ व प्रतिष्ठित नागरिक, शांतता मोहल्ला समितीचे सदस्य तसेच डीजे वादक बैठकीला उपस्थित होते. गणेशमूर्तीची स्थापना, मिरवणुकीचा मार्ग व वेळ आणि विसर्जनाबाबत प्रशासनाने निश्चित केलेल्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाने केले. डीजेच्या आवाजावर मर्यादा डीजेच्या आवाजाची निर्धारित मर्यादा व वेळेचे बंधन पाळण्यासह लेझर लाइटच्या वापराबाबतच्या नियमांचे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. ध्वनिप्रदूषणामुळे नागरिकांना त्रास होणार नाही, याची विशेष दक्षता घेण्याचे आवाहन पोलिसांनी केले.

## ज्यांनी मराठ्यांना न्याय दिला त्यांच्यावरच टीका योग्य नाही, जरांगेंनी संयमाने बोलावं

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा समाजाला न्याय दिला आहे, परंतु जे लोक मराठा समाजाला सातत्याने देत आहेत त्यांच्यावर टीका करण्याची नवी पद्धत सुरू आहे, असं राज्याचे मंत्री उदय सामंत म्हणाले. मनोज जरांगे यांच्या १५ पैकी १२ मागण्या मान्य केल्या असून त्यांनी गणेशोत्सवामध्ये मुंबईमध्ये येऊन अडचणी निर्माण करू नये, असं आवाहन उदय सामंत यांनी केलं. मराठा समाजाच्या मागण्यांसंदर्भात पुढील निर्णय काय घ्यायचा, पुढची दिशा काय असावी यासाठी जरांगे यांनी १२ सप्टेंबर रोजी अंतरावाली सराटीमध्ये जमण्याचं आवाहन मराठा समाजाला केलं आहे.

**पाहिजेत**

जय श्रीराम ॲग्रीकल्चर फार्मर प्रोड्यूसर कंपनी लि.मालखेड, ता.वरुडच्या कॉटन सीड ऑईल मील इंडस्ट्रीज प्रा.लि. बांधकाम व यांत्रिकीरणाकरीता पार्ट टाईम सिव्हील व मेकॅनिकल अभियंता तसेच लेखापालची आवश्यकता आहे.

स्थानिक इच्छुकांनी दि.१५/०९/२०२६ पुर्वी बायोडाटासह संपर्क साधावा.

संपर्क

८३९०८५१५१५, ९४२३६४८०११

### जाहीर नोटीस

**तहसिलदार मोर्शी यांचे न्यायालय**

रा.मा.क्र./२६७/MRC-८१/लाखारा/२०२५-२६

**जाहीरनामा**

या कार्यालयाचे ज्ञापनाव्दारे कळविण्यात येते की, प्रकरणात अर्जदार **दिव्या दिपकराव आहाळे, रा.लाखारा ता.मोर्शी, जि.अमरावती** यांचा स्वत: जन्म दि. रोजी लाखारा येथे झाल्याने जन्माची नोंद **ग्रामपंचायत उमरखेड** येथे करण्याकरीता निबंधक, ग्रामपंचायत उमरखेड यांना आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयच्या असेल त्यांनी जाहीरनामा वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाचे आत आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदती नंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतींचा विचार करण्यात येणार नाही. व प्रकरणात पुढील कार्यावाही करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार मोर्शी**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड, ( इन चॉर्ज श्री.व्ही.व्ही.राजुरकर साहेब ) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७२१/२०२६ ने.ता.२७/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) नंदा गुणवंतराव वाघ, वय अं.५४ वर्ष, धंदा-घरकाम रा.शहापूर, ता.वरुड, जि.अमरावती

२) गोपाल भिमराव दंडाळे, वय अं.५१ वर्ष, धंदा- शेती

३) सत्यपाल भिमराव दंडाळे, वय अं.४८ वर्ष, धंदा-शेती क्र.२ व ३ रा.पेठ मांगरुळी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत भिमराव बागोजी दंडाळे व मयत भागीरथी भिमराव दंडाळे, रा.पेठ मांगरुळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२७/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **२७/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# खारमधील हॉटेलवर पोलिसांचा छापा : पैशांचे आमिष दाखवून महिलेला वेश्याव्यवसायात ढकलल्याचा आरोप

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – खार पश्चिम परिसरातील एका हॉटेलमध्ये सुरू असलेल्या कथित वेश्याव्यवसायाच्या रॅकेटवर खार पोलिसांनी कारवाई केली. पोलिसांनी छापा टाकून एका महिलेची सुटका केली असून, या प्रकरणात २६ वर्षीय महिलेला अटक करण्यात आली आहे. ही कारवाई ७ सप्टेंबर रोजी राम कृष्ण नगर, एस. व्ही. रोड परिसरातील एका हॉटेलमध्ये करण्यात आली. पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार, ओशिवरा परिसरात राहणारी आरोपी महिला कथितरित्या हे रॅकेट चालवत होती. मॉडेलिंग क्षेत्रातील महिलांना पैशांचे आमिष दाखवून वेश्याव्यवसायात आणले जात असल्याचा आरोप तिच्यावर आहे. या प्रकरणाची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी नियोजन करून हॉटेलवर छापा टाकला. कारवाईदरम्यान पोलिसांनी रोख रक्कम, मोबाईल फोन आणि इतर साहित्य जप्त केले. जप्त केलेल्या वस्तूंची एकूण किंमत सुमारे १.७३ लाख रुपये असल्याचे सांगण्यात येत आहे. यामध्ये २२,००० रुपये रोख रक्कम, ५०० रुपयांच्या दोन अस्सल नोटा आणि १,००० रुपयांच्या ९८ बनावट नोटांचा समावेश आहे. याशिवाय पोलिसांनी कंडोमचा एक बॉक्स तसेच दोन महागडे मोबाईल फोनही जप्त केले.या प्रकरणी खार पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम १४३ तसेच अनैतिक वाहतूक प्रतिबंधक कायदा, १९५६ मधील कलम ४ आणि ५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड, ( इन चॉर्ज श्री.व्ही.व्ही.राजुरकर साहेब ) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७३९/२०२६ ने.ता.०५/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१) लिला श्रावण पाटील, वय अं.७४ वर्ष, धंदा-घरकाम रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

२) सुशिलादेवी अमरसिंह, वय अं.४४ वर्ष, धंदा- घरकाम रा.सदरपूर साकीत, जि.एटा (उत्तरप्रदेश)

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत सरस्वती माणिकराव कापसे, रा.शेंदुरजाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०५/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२८/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड, ( इन चॉर्ज श्री.व्ही.व्ही.राजुरकर साहेब ) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७४३/२०२६ ने.ता.०१/१०/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती अनिता प्रदीप पाटील, वय अं.३९ वर्ष, धंदा-गृहिणी, २) कु.रुतिका प्रदीप पाटील, वय अं.१४ वर्ष, धंदा- शिक्षण, ३) कु.समृध्दी प्रदीप पाटील, वय अं.११ वर्ष, धंदा- शिक्षण, (अर्जदार क्र.१ ही स्वत:करीता व अ.पा.क म्हणुन अर्जदार क्र.२ व ३ करीता) ५) श्रीमती ताराबाई उकंडराव पाटील, वय अं.६९ वर्ष, धंदा-गृहिणी, सर्व रा.वार्ड क्र.६ बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत प्रदिप उकंडराव पाटील, रा.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०१/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२१/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड, ( इन चॉर्ज श्री.व्ही.व्ही.राजुरकर साहेब ) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७१०/२०२६ ने.ता.२४/०९/२०२६**

**अर्जदार :-**

नलिनी नामदेवराव तडस
वय अं.५९ वर्ष, धंदा-घरकाम
रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत वसंत सखाराम श्रीखंडे व मयत मैनाबाई वसंतराव श्रीखंडे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२४/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **२१/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७५४/२०२६ ने.ता.०६/१०/२०२६**

**अर्जदार :-** १) अफगाना बी उबेदुर रहेमान खान, वय अं.६७ वर्ष, धंदा-घरकाम, २) जाहीद खान उबेदुर रहेमान खान, वय अं.४५ वर्ष, धंदा- मजुरी, ३) आसीम खान उबेदुर रहेमान खान, वय अं.४३ वर्ष, धंदा- मजुरी, ४) आरीफ खान उबेदुर रहेमान खान, वय अं.३८ वर्ष, धंदा- मजुरी, क्र.१ ते ४ रा.शहापूर, ता.वरुड, जि.अमरावती, ५) फरहाना फिरदौस साईद खान, वय अं.४० वर्ष, धंदा-घरकाम, रा.बंगला चौक, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत उबेदुररहेमान खान अब्दुल रहेमान खान, रा.शहापूर, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०६/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०२/०९/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

### १२ वीसाठी कॉलेज बदलण्याकडे कल

## राज्यात ६१ हजार अर्ज, मुंबईत ३,८४२ विद्यार्थ्यांचे कॉलेज बदलीसाठी अर्ज

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – इयत्ता ११ वी पूर्ण केल्यानंतर ज्युनिअर कॉलेज बदलू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली असून, यावर्षी




राज्यभरातून इयत्ता १२ वीसाठी तब्बल ६१,५९२ विद्यार्थ्यांनी कॉलेज बदलीसाठी अर्ज केले आहेत. १० वीनंतर इच्छित कॉलेजमध्ये प्रवेश न मिळालेले विद्यार्थी १२ वीच्या महत्त्वाच्या वर्षासाठी कॉलेज बदलण्यास उत्सुक असल्याचे यावरून स्पष्ट होत आहे.

राज्यभरातून प्राप्त झालेल्या ६१,५९२ अर्जांपैकी ३०,२७४ अर्जांना आतापर्यंत मंजुरी देण्यात आली आहे, तर १५,१८४ अर्ज अजूनही छाननी आणि मंजुरीच्या विविध टप्प्यांवर प्रलंबित आहेत.

## उच्च न्यायालयाचा स्टेट बँकेला दणका : मूळ कागदपत्रे परत करणे बँकेचीच कायदेशीर जबाबदारी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – कर्जदाराने कर्जाची संपूर्ण रक्कम परतफेड केल्यानंतर त्याने तारण ठेवलेल्या मालमत्तेची मूळ कागदपत्रे जतन करणे आणि ती कर्जदाराला परत करणे ही बँकांचीच कायदेशीर जबाबदारी




आहे, असा महत्त्वपूर्ण निवाळा मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दिला आहे. प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अखंड यांच्या खंडपीठाने मालमत्तेची मालकी दर्शवणारी मूळ कागदपत्रे गहाळ केल्याप्रकरणी 'स्टेट बँक ऑफ इंडिया'ला (एसबीआय) मोठा झटका दिला. न्यायालयाने मुंबईतील एका कंपनीला १ डिसेंबर २०२३ पासून दररोज पाच हजार रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश एसबीआयला दिले आहेत. 'मेसर्स इन ओग क्रिएशन' या कंपनीने १९७९ मध्ये एसबीआयकडून कर्ज घेतले होते.

## वरुडच्या आश्रमशाळेचा देशात दुसरा क्रमांक

### माणिकपूरच्या विद्यार्थ्यांनी फडकवला दिल्लीत झेंडा



(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – दुर्गम भागात शिकणाऱ्या आदिवासी लेकरांनी थेट देशाच्या राजधानीत आपल्या मातीचा झेंडा फडकवून नवा इतिहास घडवला. भारतीय उद्योग महासंघाच्या दहाव्या शालेय शिक्षण परिषदेत अमरावती जिल्ह्यातील वरुड नजीकच्या माणिकपूर शासकीय माध्यमिक आश्रमशाळेने देशात दुसरा क्रमांक पटकावून मोठी कमाल केली. देशभरातील शेकडो नामांकित खाजगी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांना मागे टाकत एका साध्या मराठी आश्रमशाळेने मारलेली ही मजल संपूर्ण महाराष्ट्राचा गौरव वाढवणारी ठरली. नवी दिल्ली येथील दि ललित या पंचतारांकित हॉटेलमध्ये ही राष्ट्रीय परिषद पार पडली. या परिषदेचे उद्घाटन माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी भारतीय उद्योग महासंघाचे महासंचालक चंद्रजित बॅनर्जी, शालेय मंचाच्या अध्यक्षा मीनाक्षी सिंग यांच्यासह अनेक शिक्षणतज्ज्ञ हजर होते. शालेय स्तरावर व्यावसायिक शिक्षण कसे द्यावे या विषयावर राष्ट्रीय सादरीकरण स्पर्धा रंगली होती. यात देशभरातून निवडलेल्या अव्वल पाच शाळांमध्ये चार मोठ्या केंद्रीय मंडळाच्या शाळा आणि एकमेव माणिकपूरची ही मराठी आश्रमशाळा आमनेसामने आल्या.

मुख्याध्यापक जी. बी. तेलमोरे यांच्या मार्गदर्शनात शिक्षक एन. डी. काळे, व्ही. बी. सोने यांनी आदिवासी मुलांना स्वावलंबी व्यावसायिक बनवणाऱ्या शिक्षणाचा खराखुरा नमुना प्रभावीपणे मांडला. परीक्षकांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक करत शाळेला राष्ट्रीय पातळीवर उपविजेता म्हणून गौरव केला. एका खेड्यातील मराठी शाळेने दिल्लीत मिळवलेल्या या मोठ्या यशा यशाबद्दल शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांवर सर्व स्तरातून कौतुकाचा मोठा वर्षाव होत आहे.

## दारूच्या पैशांवरुन कडाक्याचे भांडण, भावाच्या हल्ल्यात ३५ वर्षीय तरुणाचा मृत्यू

### खोलीत कोंडून लोखंडी सळईने सपासप वार

### पार्डी चौक परिसरातील धक्कादायक घटना

### वरुड पोलिसांकडून आरोपी भावास अटक

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – दारू पिण्याच्या पैशांवरून दोन सख्ख्या भावांमध्ये उडालेल्या जोरदार वादाचे पर्यवसान अखेर खुनात झाल्याची थरारक घटना वरुड शहरातील पार्डी चौक भागात घडली.

मोठ्या भावाने लहान भावाला खोलीत डांबून लोखंडी सळईने केलेल्या जबर हल्ल्यात लहान भावाचा मृत्यू झाला असून, माहेरहून परतलेल्या पत्नीच्या तक्रारीवरून पोलिसांनी मारेकरी भावाला बेड्या ठोकल्या आहेत. पार्डी चौक परिसरात गजानन अनिल काळे आणि मोहन अनिल काळे हे दोन सख्खे भाऊ कुटुंबीयांसह राहतात. दोघांनाही दारूचे भयंकर व्यसन असल्याने घरात







नेहमीच पैशांवरून कुरबूर चालायची. काल पाच तारखेला दुपारी पुन्हा दारूच्या पैशांवरून दोघांत कडाक्याचे भांडण सुरू झाले. वादाच्या भरात लहान भाऊ मोहन काळे यांनी मोठ्या भावाला शिवीगाळ केली. या शिवीगाळीमुळे मोठा भाऊ गजानन अनिल काळे याचा पारा चांगलाच चढला. रागाच्या भरात गजाननने लहान भाऊ मोहनला ओढत नेऊन घराच्या खोलीत कोंडले.

त्यानंतर खोलीत पडलेली जाड लोखंडी सळई उचलून मोहन यांच्या अंगावर, डोक्यावर सपासप वार केले. या जीवघेण्या हल्ल्यात पस्तीस वर्षीय मोहन काळे रक्ताच्या थारोळ्यात पडले. गंभीर जखमी झालेल्या मोहन यांना उपचारासाठी घाईघाईने एका खासगी दवाखान्यात नेण्यात आले. मात्र प्रकृती नाजूक असल्याने तिथे उपचार मिळू शकले नाहीत, त्यामुळे त्यांना पुन्हा घरी आणून ठेवण्यात आले. रात्री उशिरापर्यंत घरी पडून राहिलेल्या मोहन यांनी अखेर घरातच तडफफडून अखेरचा श्वास घेतला.

> **दारुच्या व्यसनाने उद्धस्त झाले हसतेखेळते घर**
>
> दारुच्या भीषण व्यसनामुळे सख्ख्या भावांमध्ये नेहमीच पैशांवरुन भांडणे होत होती. या नशेतच रक्ताच्या नात्याचा विसर पडून मोठ्या भावाने धाकट्याचा निघृण काटा काढला. पतीचा जीव गेल्याने आणि जेठ गजाआड झाल्याने दोन वर्षांनंतर घरी परतलेल्या पत्नीवर आभाळ कोसळले असून, व्यसनापायी एका क्षणात हसतेखेळते घर पार उद्धस्त झाले.

भावाचा जीव गेल्यानंतरही आरोपीने पोलिसांत कसलीच वाच्यता केली नाही.घरगुती भांडणामुळे मृतक मोहन काळे यांची पत्नी काजल मोहन काळे या गेल्या दोन वर्षांपासून माहेरी राहत होत्या.

पतीच्या गंभीर मारहाणीची कुणकुण लागताच त्या तात्काळ सासरी पोहोचल्या. पती रक्ताळलेल्या अवस्थेत निपचित पडल्याचे पाहताच त्यांनी थेट वरुड पोलीस ठाणे गाठून फिर्याद दिली.

पोलिसांनी तातडीने खुनाचा गुन्हा दाखल करून आरोपी गजान अनिल काळे याला अटक केली. दारूच्या एका व्यसनाने सुखी संसाराची राखरांगोळी केल्याने वरुड परिसरात तीव्र हळहळ व्यक्त होत आहे.

### न.प.मराठी शाळेच्या प्रांगणातील दहीहांडी स्पर्धेत

## नवनीत राणा यांची खासदार डॉ.अनिल बोंडे यांचेवर अप्रत्यक्षपणे टिका

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – काल (ता.६) न.प.मराठी शाळेच्या प्रांगणात आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांनी आयोजीत केलेल्या दहीहांडी कार्यक्रमामध्ये अमरावतीच्या माजी खासदार नवनीत राणा यांनी राज्यसभा खासदार तथा मोर्शी मतदारासंघाचे माजी आमदार डॉ.अनिल बोंडे यांचे नाव न घेता टिका केल्याने राजकीय क्षेत्रात मोठी खळबळ माजली आहे. थेट भाजपाच्याच व्यासपिठावरुन नवनीत राणा यांनी खासदार डॉ.अनिल बोंडे यांनाच आवाहन दिल्याने आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे.



नवनीत राणा यांनी केलेल्या टिकेचा खा.डॉ.अनिल बोंडे यांच्या समर्थकांकडून निषेध केल्या जात आहे.

प्राप्त माहीती नुसार, आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांनी न.प.मराठी शाळेच्या प्रांगणात दहीहांडी स्पर्धेचे आयोजन काल ६ सप्टेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास करण्यात आले होते. या कार्यक्रमाकरीता अमरावतीच्या माजी खासदार तथा भाजपा नेत्या नवनीत राणा यांना प्रमुख अतिथी म्हणुन निमंत्रित करण्यात आले होते. अशा स्थितीत सायंकाळच्या सुमारास दहीहांडी स्पर्धा सुरु होण्यापुर्वीच नवनीत राणा यांचे कार्यक्रमास्थळी आगमन झाले आणि उपस्थितांनी टाळयांचा प्रचंड कडकडाट केला. या कार्यक्रमाला आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर यांची सुध्दा उपस्थिती होती.

यावेळी बोलतांना नवनीत राणा यांनी आजी माजी लोकप्रतिनिधींना आता थारा देवु नका, ते आमदार असतांना कोणत्याही प्रकारचा विकास त्यांनी केला नाही, संत्र्याला भाव मिळाला पाहीजे, यासाठी त्यांनी कोणताही प्रयत्न केला नाही, त्यामुळे आता आपल्या मतदारसंघाला स्वच्छ प्रतिमेचा माणुस मिळाला आहे, त्यांचे पाठीशी ठामपणे उभे राहा, आजी–माजी आमदारांना आता तुम्ही थारा देवु नका, असे आवाहन केले. नवनीत राणा यांनी अप्रत्यक्षपणे खासदार डॉ.अनिल बोंडे यांचेवर केलेल्या टिकेने उपस्थितांमध्ये एकच खळबळ माजली होती. यापुर्वी डॉ.अनिल बोंडे आणि नवनीत राणा–रवी राणा यांचे मित्रत्व संपुर्ण जिल्हयानेच नव्हे तर राज्याने बघितले आहे परंतु गेल्या काही दिवसांपासुन दोघांमध्ये निर्माण झालेले वितुष्ट भारतीय जनता पार्टीतील धुसफूस तर बाहेर आणणार नाही ना? अशी चर्चा सद्य: संपुर्ण जिल्हयात सुरु आहे. थेट भाजपाच्या व्यासपिठावरुन नवनीत राणा यांनी भाजपच्याच नेत्याला आवाहन दिल्याने या कार्यक्रमाची चांगलीच चर्चा सद्य: जिल्हयात सुरु आहे.

## विहिरीत बुडून बिबट्याचा मृत्यू

### ढगा शेतशीवारातील घटना बिबट्याचे शवविच्छेदनं करून अंत्यसंस्कार

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**वरुड** – तालुक्यातील ढगा शेतशीवारातील एका विहिरीमध्ये पाण्यात बुडून एका बिबटाचा मृत्यू झाल्याची घटना आज दि ६ ला उघडकीस आल्याने एकच खळबळ माजली. मृत बिबटाचे शवविच्छेदनं करून अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रकरणी वनविभाग पुढील तपास करीत आहे.



ढगा तालुक्यातील शेतशिवरातील गोविंद पंधरे यांचे शेतातील विहिरीत अंदाजे सात महिने वय असलेल्या बिबट पाण्यात बुडून मृत झालेला दिसून आला. या घटनेने एकाच खळबळ उडाली. लागलीच या घटनेची माहिती वाणाधिकाऱ्यांना देण्यात आली. माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. मृतक बिबटाला विहिरी बाहेर काढून मोर्शी येथील पशु वैद्यकीय दवाखान्यात बिबाटाचे शवंविच्छेदनं करण्यात आले. त्यानंतर तालुक्यातील पुसला वनपरीक्षेत्रात मृत बिबाटावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पाण्यात पडून बिबटाचा मृत्यू झाल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

या प्रकरणी उपवनसंरक्षक अर्जुना के. मार्गदर्शनाखाली वनसंरक्षक डॉ. मयूर भैलुमे, वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत भुजाडे, मानत वन्यजीव रक्षक डॉ. सावंत देशमुख, वतुळ अधिकारी गौरव जांबे, वनरक्षक प्रतीक चावरे व इतर वन कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली असून पुढील तपास सुरु आहे.

